## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. १९.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता.

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५१० / सोलापूर | श्री. शिवाजी हणमंत सुगरे सलगर वस्ती, डोणगाव रोड, सोलापूर | पोलीस उपनिरीक्षक, श्रीगोंदा पोलीस स्टेशन, पोलीस दुरक्षेत्र, श्रीगोंदा, जि. अहमदनगर | पोलिस निरीक्षक, श्रीगोंदा पोलिस स्टेशन, पोलीस दुरक्षेत्र, श्रीगोंदा, जि.अहमदनगर | मौजे काष्टी येथे दि. ९.१.०६. रोजी श्री. सुगरे बंधूंना पारध्यांनी मारहाण करून लुटले, या दाखल केलेल्या फिर्यादीच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईची माहिती. | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | ५११/ सोलापूर | श्री. शिवाजी हणमंत सुगरे सलगर वस्ती, डोणगाव रोड, सोलापूर | कक्ष अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर, जि. अहमदनगर | पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), अहमदनगर जि.अहमदनगर | मौजे काष्टी येथे दि. ९.१.०६. रोजी श्री. सुगरे बंधूंना पारध्यांनी मारहाण करून लुटले, या दाखल केलेल्या फिर्यादीच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईची माहिती. | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | ६१५/ सोलापूर | श्री. शिवाजी हणमंत सुगरे सलगर वस्ती, डोणगाव रोड, सोलापूर | पोलीस निरीक्षक, विजापूर नाका, पोलीस स्टेशन, सोलापूर | सहायक पोलीस आयुक्त, सोलापूर | श्री. एम. डी. शेख व चंद्राम. चव्हाण वगैरे विरूध्द ५.६.०७.व २०.११.०६ रोजी लेखी तक्रारी अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती. | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

वरील तक्त्यातील अ. क्र. १ ते ३ अपिले (क्र. ५१०,५११ व ६१५) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. ३१.१२.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२६.५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२३ / पुणे /२००६ | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.निसार जब्बार शेख<br>नेहरु चौक, डॉ.गोडबोले शेजारी, दौंड, जि.पुणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्याधिकारी, दौंड नगरपरिषद, दौंड, जि.पुणे | गैरहजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उपआयुक्त(सामान्य प्रशासन, पुणे विभाग, पुणे-१) | हजर |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.निसार जब्बार शेख यांनी नगरपरिषद दौंड अंतर्गत पाण्याच्या टाकीबाबत व इतर आठ मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, दौंड नगरपरिषद, दौंड यांच्याकडे दि.३१.१.२००६ रोजी मागितली होती. मागितलेल्या माहितीपैकी पाच मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत दिली. अपीलकर्त्याने दि.४.१०.२००६ रोजी आयोगाकडे अपील दाखल केले.दि.२६.५.२००८ रोजी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अर्जदाराने मागणी केलेल्या आठ मुद्दयांपैकी पाच मुद्दयांची माहिती अर्जदारास मिळालेली आहे. तसे अर्जदाराने अपील अर्जातच मान्य केले आहे.

'अपिलार्थी यांनी तांत्रिक मुद्दयांबाबत नगरपरिषदेला अभिप्राय विचारण्यात आले आहेत, त्याबाबत अशाप्रकारचे अभिप्राय नगरपरिषदेकडून देण्याची तरतूद नाही, परंतु त्या तांत्रिक अभिप्रायाबाबत त्यांनी सहाय्यक संचालक नगररचना विभाग, पुणे यांच्याकडून उपलब्ध करुन घ्यावी,' असे अपिलीय प्राधिकारी यांनी दि.२१.७.२००६ रोजीच्या निकालपत्रात नमूद केले आहे. तसेच मुख्याधिकारी यांनीही दि.२८.५.२००८ रोजी आयोगाला पाठविलेल्या पत्रात- 'श्री.निसार जब्बार शेख यांची नगरपरिषदेने नगरपरिषदेच्या पाण्याची टाकी बांधण्याच्या जागेतील अतिक्रमण करुन बेकायदेशीर टाकलेली टपरी काढल्यामुळे श्री.शेख हे माहिती अधिकारात सतत अर्ज देत असून निष्कारण त्रास देण्याची भूमिका घेत आहेत. सदरबाबत दि.११.१२.२००७ च्या अहवालामध्ये सद्यस्थिती व सविस्तरपणे खुलासा सादर केला आहे,' असे नमूद केले आहे. अन्य कोणत्याही कार्यवाहीमुळे त्रास देण्यासाठी माहितीच्या अधिकाराचा वापर केला जात असल्यास त्याविरुध्द जन माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी यांनी रीतसर कायदेशीर कारवाई करणे योग्य ठरेल.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१६.१२.२००८**

डिसेंबर-२००८मौ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६२१ / पुणे | श्री. पंडीत धोंडीबा चव्हाण बी-३०२, अक्षय गार्डन, संभाजीनगर अप्पर धनकवडी, पुणे-४११ ०४३ | सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी मर्या., केडगाव विभाग, ता.दौंड, जि.पुणे | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी मर्या., केडगाव विभाग, ता.दौंड, जि.पुणे | तळेगाव ढमढेरे (विठ्ठलवाडी-भोसे), ता. शिरूर, जि. पुणे हद्दीतील शेती पंपासाठी वीज पुरवठा करणेबाबत एकूण आठ मुद्दयांची माहिती | माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नाही, असे अपीलकर्त्याने दि. १२.६. २००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |
| २ | ६२२ / पुणे | श्री. पंडीत धोंडीबा चव्हाण बी-३०२, अक्षय गार्डन, संभाजीनगर अप्पर धनकवडी, पुणे-४११ ०४३ | सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी मर्या., केडगाव विभाग, ता.दौंड, जि.पुणे | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी मर्या., केडगाव विभाग, ता.दौंड, जि.पुणें | तळेगाव ढमढेरे (विठ्ठलवाडी-भोसे), ता. शिरूर, जि. पुणे येथील शेती पंपासाठी वीज पुरवठा मागणी अर्ज ८५३ दि. २४.२.२००६ च्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कारवाईची माहिती | माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नाही, असे अपीलकर्त्याने दि. १२.६. २००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |
| ३ | ६३८/ पुणे | श्री. प्रभाकर रघुनाथ माने ५१, बुधवार पेठ, अगत्य हॉटेल शेजारी, तुळशी - बाग, पुणे-२ | विकास अभियंता, पुणे महानगर-पालिका, पुणे-५ | शहर अभियंता, पुणे महानगर-पालिका, पुणे-५ | बेसमेंटचा वापर करण्याबाबत माहिती | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ७७९ / पुणे | श्री. कृष्णचंद्र बुध्दालाल गर्ग २८९, गणेश पेठ, अल्पना टॉकीज समोर, पुणे-२ | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, पुणे | तहसीलदार, हवेली, तहसील कार्यालय, हवेली, जि. पुणे | मौजे खराडी, ता.हवेली येथील स.नं.४३/१ +२/२ जमिनीबाबत रेकॉर्ड ऑफ राईटस् प्रमाणे खरेदी दस्त क्र.७८६३/८९ प्रमाणे नोंद घेणेबाबत | अपीलकर्त्याचा विषय प्रशासकीय कार्यवाहीचा असून त्याचा समावेश माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत होत नाही. |
| ५ | १६८८ / पुणे | श्री. अमिन जैनुद्दीन शेख, १२/३६/२, दुर्गा दर्शन, यमुना नगर, निगडी, पुणे-४४ | लेखाधिकारी, (अर्थ विभाग), जिल्हा परिषद, सोलापूर | मुख्य लेखाधिकारी (अर्थ विभाग), जिल्हा परिषद, सोलापूर | सुधारित सेवानिवृत्त वेतन मंजुरीच्या आदेशानुसार माहिती | आवश्यक माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ६ | ९९७ / पुणे | श्री. कल्याण भगवान लंकेश्वर अ/२६, गोयल-शिंदे पार्क, भाऊ पाटील रोड, बोपोडी, पुणे-२० | जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, पुणे-१ | प्रादेशिक व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, पुणे-१ | एप्रिल १९९५ ते मार्च २००७ या कालावधीतील वसुली पावती पुस्तकांची माहिती | आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नाही, असे अपीलकर्त्याने आयोगास दि.१५.७.२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. |
| ७ | १४२२ / पुणे | श्री. वासुदेव रामचंद्र पास्टे बी/२/१३, इंदिरानगर-लोअर बिबवेवाडी, पुणे-३७ | प्रशासन अधिकारी, सहसंचालक (उच्च शिक्षण) यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ | सहसंचालक, (उच्च शिक्षण) यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ | शाहू मंदिर महाविद्यालय, पुणे-९ येथे अतिरिक्त कर्मचारी म्हणून ग्रंथालय परिचर या पदावरील नियुक्तीच्या अनुषंगाने माहिती | आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नाही, असे अपीलकर्त्याने आयोगास दि.१५.११. २००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. |
| ८ | १०१० / पुणे | श्री. नितीन यशवंत देशपांडे ३, गौरीशंकर, ५०-अ, पेस्तम सागर, | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, | तहसीलदार, तहसील कार्यालय, मुळशी, | सन २००३ ते मार्च २००७ या कालावधीत मौजे नांदिवली, ता. | आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नाही, असे अपीलकर्त्याने |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | रस्ता नं.२, चेंबूर, मुंबई-८९ | मुळशी, जि.पुणे | जि. पुणे | मुळशी, येथील महसूल दप्तरी नोंदविण्यात आलेल्या अभिलेखाचे निरीक्षण करण्याबाबत एकूण सहा मुद्दयांची माहिती | दि.२०.१०.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |
| ९ | १०११ / पुणे | श्री. नितीन यशवंत देशपांडे ३, गौरीशंकर, ५०-अ, पेस्तम सागर, रस्ता नं.२, चेंबूर, मुंबई-८९ | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, मुळशी, जि.पुणे | तहसीलदार, तहसील कार्यालय, मुळशी, जि. पुणे | सन २००३ ते मार्च २००७ या कालावधीत मौजे नांदिवली, ता. मुळशी, येथील महसूल दप्तरी नोंदविण्यात आलेल्या अभिलेखाचे निरीक्षण करण्याबाबत एकूण सहा मुद्दयांची माहिती | आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नाही, असे अपीलकर्त्याने दि.२०.१०.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील सर्व अपिले (क्र. ६२१, ६२२, ६३८, ७७९, १६८८, ९९७, १४२२, १०१० व १०११ ) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. १५.१२.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक १६-१२-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ६९४/ सांगली | श्री.शिवाजी महादेव जावीर मु.पो.नेलकरंजी, ता.आटपाडी, जिल्हा सांगली | माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, खानापूर, उपविभाग, विटा, जिल्हा सांगली | अपर जिल्हाधिकारी सांगली | मौजे नेलकरंजी येथील सि.सं.नं.३९१ येथील अतिक्रमण हटवून त्या ठिकाणी जागा देणेबाबत | अपील क्र.४३०/ सांगली मध्ये दि.१४/११/२००८ रोजीच्या आदेशान्वये दिलेला निर्णय कायम ठेवण्यात येत आहे. |
| २. | ७२१/ सांगली | श्री.सुजित राजाराम काटे सचिन मेन्स वेअर, संजयनगर, १०० फुटी रोड, सांगली जिल्हा सांगली | जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हा नागरी विकास यंत्रणा, सांगली | निवासी उपजिल्हाधिकारी सांगली जिल्हा सांगली | सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेसंबंधात जिल्हाधिकारी यांचे अधिकार व कर्तव्याबाबतचे परिपत्रक व सांगली जिल्हा परिषदेच्या पूर्व व उत्तर बाजूस असलेल्या खाणीस दगडी बांधकामाचे कुंपण भिंत घालण्यास महानगरपालिकेला मान्यता दिली त्या परिपत्रकाची प्रत | जन माहिती अधिकारी/ अपिलीय प्राधिकारी यांनी १५ दिवसांत माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. परिपत्रक देण्यासाठी एवढा विलंब लागणे योग्य नाही. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ७२८/ सांगली | श्री.आर.एल. कांबळे व्दारा औद्योगिक -न्यायालय, सांगली १८३,१८४ वसंत मार्केट यार्ड सांगली | अप्पर कोषागार अधिकारी , सांगली | कोषागार अधिकारी , सांगली | सन २००१ पूर्वी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याच्या सेवा शुल्कात कपात केली असले तर त्यांचे व्हाउचर/बिल नंबर ३.२ मुद्दयांची माहिती | सेवा शुल्क परत मिळणे ही बाब कार्यवाहीचा भाग असून त्याचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये समावेश होत नाही. |
| ४ | ७४५/ सांगली | श्री.राजेंद्र नामदेव साबळे वर्षा निवास, साठे नगर, आटपाडी, जिल्हा सांगली | जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी १०३ चुनावाला चेंबर्स, जुना तोफखाना शिवाजीनगर, पुणे ५ | सह आयुक्त ग्रामिण व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य , ३ चर्च रांड, पुणे १ | पुणे जिल्ह्यातील महिला व बालकल्याण विभाग यांच्या अखत्यारितील शासकीय संस्थेच्या स्थापनेपासून कर्मचाऱ्यांची माहिती | दि.३१/१२/२००८ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले आहे. |
| ५ | ७५२/ सांगली | श्री.बाळकृष्ण बाबूराव मडीयाळ मु.खटाव, ता.पलूस, जिल्हा सांगली | सचिव, गणपती पाणी पुरवठा सह.संस्था मार्या., खटाव, ता. पलूस, जि. सांगली | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पलूस, जिल्हा सांगली | सन १९८७-८८ पासून ते २००७-२००८ या कालावधीतील पाणी पुरवठयासंस्थे संबंधात ५ मुद्दयांची माहिती | अपिलकर्त्यास जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी १५ दिवसांत माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यातील चर्चेअंतीचा निष्कर्ष नोंदवून त्यानुसार कार्यवाहीचे आदेश देऊन ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

आदेश

(१) वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले (क्र.६९४,७२१,७२८,७४५ व ७५२ ) निकाली काढण्यात येत आहेत.

(२) जन माहिती अधिकारी /अपिलीय प्राधिकारी यांनी आदेश प्राप्त झाल्यापासून एक आठवड्यात कार्यवाहीचा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य योग्य त्या कारवाईस पात्र ठरतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३१-१२-२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दिनांक १६-१२-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे - नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे नाव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७०८/ सांगली | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, मिरज, जिल्हा सांगली | प्रशासकीय अधिकारी (सांगली) सांगली मिरज आणि कुपवाड शहर महापालिका , जिल्हा सांगली | आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महापालिका, जिल्हा सांगली | महानगरपालिका सांगली येथील प्रभाग क्र.१२ पोटनिवडणुकीमधील व्हिडीओ शुटींगबाबत | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | ७२०/ सांगली | श्री.सुजित राजाराम काटे सचिन मेन्स वेअर, संजय-नगर, १०० फुटी रोड, सांगली जिल्हा सांगली | नगर अभियंता तथा राज्य माहिती अधिकारी , सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगर पालिका | आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महापालिका सांगली | सांगली जिल्हा परिषदेच्या इमारतीजवळ महानगरपालिकेने सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतून केलेल्या कामाच्या अनुषंगाने एकूण ४ मुद्दयांची माहिती | जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी १५ दिवसांत माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ७३९/ सांगली | श्री.प्रकाश उर्फ अनिल राजाराम बाबर म्हैशाळ वेस भीम नगर मिरज, जिल्हा सांगली | जन माहिती अधिकारी तथा विभाग अधिकारी प.स.क्र.४ सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महापालिका | उप आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महापालिका सांगली | महापौर चषक फुटबॉल स्पर्धेबाबत | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | ७४०/ सांगली | श्री. आर. ए. पठाण चेअरमन सरकारी नोकर मालकी भाडेकरु सह. गृह निर्माण संस्था, कुपवाड रोड, मु.पो.मिरज, जिल्हा सांगली | सहा.आयुक्त सांगली मिरज आणि कुपवाड शहर, महानगरपालिका | उप आयुक्त, सांगली मिरज कुपवाड शहर महापालिका सांगली | गटारीच्या कामाच्या मजुरीबाबत | माहिती प्राप्त झाल्याबाबत अपीलकर्त्याने दि. १२/१२/२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले . |
| ५ | ७५०/ सांगली | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, मिरज, जिल्हा सांगली | उप अभियंता तथा माहिती अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, सांगली विभाग , सांगली | अधिक्षक अभियंता महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ. मंडळ वाकडेवाडी, पुणे ४. | कार्यालयीन कामकाज व त्या अनुषंगीक एकूण ४ मुद्दयांची माहिती | जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी १५ दिवसांत माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ६ | ६९१/ सांगली | श्री.शिवाजी आनंदा कापसे, मु.पो.रेठरे धरण, ता.वाळवा, जिल्हा सांगली | गट शिक्षणाधिकारी (प्राथ) वाळवा, पंचायत समिती वाळवा , जिल्हा सांगली | शिक्षणाधिकारी (प्राथ) जिल्हा परिषद, सांगली | फेब्रुवारी २००८ मध्ये झालेल्या शिक्षकांच्या अधिवेशनाबाबत माहिती | माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्यांने प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ७४४/ सांगली | श्री.शिवाजी यशवंत घराळ मु.पो.कासेगाव, ता वाळवा , जिल्हा सांगली | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा पं) जिल्हा परिषद , सांगली | मुख्य कार्यकारी अधिकारी , सांगली जिल्हा परिषद सांगली | दि.३१/१/२००४ ते ३१/१२/२००७ या कालावधीतील ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी /विस्तार अधिकिारी (पंचायत)/आय आर डी.पी. यांना देण्यात येणाऱ्या सेवानिवृत्ती उपदान/मृत्यू-उपदान/ गटविमा इत्यादीबाबत माहिती. | न माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी १५ दिवसांत माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ८ | ७१२/ सांगली | श्री.विलास आकाराम खोत रा.इस्लामपूर कर्मवीर नगर पोलीस लाईनच्या पाठीमागे, ता. वाळवा, जिल्हा सांगली | ग्रामसेवक, गाव-देवर्डे , ता.वाळवा, जिल्हा सांगली | गट विकास अधिकारी , वाळवा पचायत समिती ,वाळवा जिल्हा सांगली | दि.१/४/२००६ ते ३१/३/२००७ या कालावधीतील ग्रामपंचायतीचा जमाखर्च व इतर ४ मुद्दयांची माहिती | जन माहिती अधिकारी /अपिलीय प्राधिकारी यांनी दि.२३/१२/२००८ पर्यंत माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ९ | ७२७/ सांगली | श्री.विनायक उत्तमराव गायकवाड मु.पो.शिगांव, ता.वाळवा, जिल्हा सांगली | ग्रामविकास अधिकारी, शिगांव ,राजर्षिशाहूनगर वाळवा, जिल्हा सांगली | गट विकास अधिकारी , वाळवा पचायत समिती , वाळवा, जिल्हा सांगली | माहे ऑक्टोबर १९९७ ते माहे जानेवारी २००७ या कालावधीत अनुसूचित जाती/जमाती या वर्गवारी करता राबविण्यात आलेल्या योजनांची माहिती | आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने दि.६/१२/२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. |

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यातील चर्चेअंतीचा निष्कर्ष नोंदवून त्यानुसार कार्यवाहीचे आदेश देऊन ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

## आदेश

(१) वरील तक्त्यात नमूद केलेले अपिले (क्र.१ ते ९ ) निकाली काढण्यात येत आहेत.

(२) अपील क्र. ७२०,७३९,७५०,७४४ व ७१२ या अपिलांमध्ये विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत अभयतांमध्ये एकमत झाले आहे. त्यानुसार पूर्तता करुन जन माहिती अधिकारी /अपिलीय प्राधिकारी यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून एक आठवड्यात पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य योग्य त्या कारवाईस पात्र ठरतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २३-१२-२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठा तर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. ०७.१०.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता.

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७१६/ सोलापूर | श्री. सादिक अ. रशिद शेख<br>१४, नाझ अंत्रोळीकर नगर -१,<br>जि. सोलापूर | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र -१,<br>जि. सोलापूर | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, बांधकाम भवन, कुमठा नाका, सोलापूर | दि. १.६.२००७ ते १५.८.२००७ या कालावधीत शासनाकडून मिळालेला एकूण निधी किती, हेडसाठीच्या रकमांचा तपशील इत्यादी. | आवश्यक माहिती मिळाल्याचे निवेदन अपीलकर्त्याने दि. २३.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांना सादर केले. सदर निवेदनाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रासोबत सादर केली. |
| २ | ९३४/ सोलापूर | श्री. महादेव गणपती लोके<br>थडगीमळा, जुना डाक बंगल्यामागे,<br>उत्कर्ष नगर,<br>मल्लिकार्जुन हौ. सोसा, शुभंकर बंगला,<br>मु.पो.ता.अक्कलकोट<br>जि. सोलापूर | मॅनेजर, सोलापूर जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्या., सोलापूर, मुरारजी पेठ,<br>जि. सोलापूर | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर | मे व जून २००५ महिन्याच्या बँक हिश्यांची प्रॉव्हिडंड फंडाची रक्कम मिळणे बाबत. | बँक हिस्सा प्रॉ. फंडाची रक्कम मिळाल्याने तक्रार राहिली नसल्याचे अपीलकर्त्याने दि. १९.६.२००८ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना कळविले त्यांनी सदर पत्राची प्रत प्रपत्रासोबत सादर केली. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६५८/ सोलापूर | श्री. जवाहरलाल महादेव चव्हाण अे - ३ / १६२ मंत्री चंडक पार्क, विजापूर रोड, जि. सोलापूर | तहसीलदार, संजय गांधी योजना, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर | कंट्रोलर ऑफ ऑडिट, दिल्ली यांना सादर केलेल्या वृध्दापकाळ योजने अंतर्गत २००० ते २००७ पर्यंतच्या वाटप केलेल्या विनियोग प्रमाणपत्राच्या सत्य प्रती. | अपीलकर्ते श्री चव्हाण मयत झाल्याचे वृत्तपत्राचे कात्रण जन माहिती अधिकारी /अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रासोबत सादर केले. |
| ४ | ६५७/ सोलापूर | श्री. जवाहरलाल महादेव चव्हाण अे - ३ / १६२ मंत्री चंडक पार्क, विजापूर रोड, जि. सोलापूर | तहसीलदार, संजय गांधी योजना, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | वृध्दापकाळ योजना तपासणी पथकांच्या अहवालाची प्रत. | अपीलकर्ते श्री चव्हाण मयत झा‿ाचे वृत्तपत्राचे कात्रण जन माहिती अधिकारी /अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रासोबत सादर केले. |
| ५ | ७४४/ सोलापूर | श्री.मोहन कृष्णा माळी मु. पो. माळीनगर, ता.माळशिरस जि. सोलापूर | उपशिक्षणाधिकारी (प्राथ), जिल्हा परिषद, सोलापूर | शिक्षणाधिकारी (प्राथ), जिल्हा परिषद, सोलापूर | जॉब सोडून काम का सांगितले, हप्ते रूपाने पैसे का गोळा केले, जादा केलेल्या कामाचे पैसे मिळावे, जन्म तारीख व कनिष्ट पद दाखवून पेन्शन ऑर्डर का दिली, विनंती अर्ज नसताना विनंतीवरून बदली का केली, इत्यादी. | दिलेली माहिती बरोबर असल्याचे व या व्यतिरिक्त अधिक माहितीची मागणी केल्यास देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले. उभयंतांमध्ये तडजोड झाली. मात्र खुलासे मागणे व कल्पितावर आधारित भाष्याची मागणी करणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील माहितीच्या व्याख्येत येत नाही. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ६७६/ सोलापूर | श्री. वसंत गोविंद खांडेकर मु.डोबाळवाडी (कुरबावी), पो.शिंदेवाडी, ता.माळशिरस, जि, सोलापूर | उपशिक्षणाधिकारी (प्राथ), जिल्हा परिषद, सोलापूर | शिक्षणाधिकारी (प्राथ), जिल्हा परिषद, सोलापूर | सन १९९२ - ९३, १९९४-९५ व १९९८ - ९९ ची पदान्नती पात्र शिक्षकांची यादी, दक्षता रोध मंजुरी - आदेशांची प्रत, सेवा पुस्तक पान क्र २७ ची प्रत, माहिती अधिकार अर्जाची प्रत व मुख्याध्यापक पदोन्नती नाकारल्याबाबतच्या एकूण १८ मुद्यांची माहिती. | मुख्याध्यापक पदोन्नती प्रक्रिया सुरू झालेली आसल्याने ती पूर्ण करण्याच्या अधीन राहून अपीलकर्त्याने अपील मागे घेत असल्याचे नमूद केले. मात्र ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| ७ | ७६९/ सोलापूर | प्रा. तुकाराम मारूती सरडे ३/२४ शिवाजीनगर (मोदि), जि. सोलापूर | विशेष भू-संपादन अधिकारी क्र - ३ जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | पुनर्वसनासाठी संपादित केलेल्या एकूण १० गावांचा ताबा केव्हा दिला व दिलेल्या जमिनीची गटवार माहिती. | माहिती जुनी व बंद होत आलेल्या अन्य पाच कार्यालयांशी सबंधित असून सहा महिन्याची मुदत देऊन प्रयत्न केला परंतु वाळवी लागून नष्ट झाली असल्याचे अपिलकर्त्यास मान्य. [illegible]अपील निकाली काढण्यावर एकमत झाले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यातील अ.क्र. १ ते ७ (अपील क्र. ७१६, ९३४, ६५८, ६५७, ७४४, ६७६, व ७६९ ) अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. २९ .१२.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.११.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७४१ / पुणे / २००७ | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | सौ.लता सुभाष गुगळे<br>मु.पो.लवळे, ता.मुळशी, जि.पुणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, भोर तहसील कार्यालय | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, भोर | हजर |

## विवेचन

अपीलकर्त्या सौ.लता सुभाष गुगळे यानी दि.२८.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, भोर यांच्याकडे मौजे कापूरहोळ, ता.भोर येथील कै.काळूराम उकिरडे यांची वारस नोंद व ७/१२, ८अ बाबत माहिती मागितली होती.

प्रकरणी दाखल कागदपत्राचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दि.१५.१२.२००७ च्या पत्राने 'फेरफाराची पुस्तके दि.१२ मे २००१ रोजी अभिलेख कक्षास लागलेल्या आगीत नष्ट झालेली आहेत. त्यामुळे त्यांची नावे कोणत्या फेरफाराने कमी झाली आहेत याचा खुलासा करणे व ८५ सालच्या वाटपाचा आदेश अर्जदार यांना देणे कागदपत्राअभावी शक्य नाही,' असे कळविले. तसेच 'अर्जदार यांनी वडिलोपार्जित जमिनीला वारस नांव दाखल

केल्यास माझी तक्रार राहणार नाही, असे अपिलीय प्राधिकारी यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त लिहून दिलेने त्यांचा अर्ज घेऊन कार्यवाही सुरु करण्यात आली,' असे दि.११.६.२००८ रोजी लिहून दिले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यांचे नाव दाखल करण्यासंदर्भातील कार्यवाहीची माहिती अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास देऊन आठ दिवसात पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.१५.१२.२००८**

डिसेंबर-२००८मौ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठा तर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. ७.१०.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता.

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७४९/ सोलापूर | श्री.बाळासाहेब अंबऋषी राठोड, व्दारा भारत धनाजी चव्हाण धनंजय निवास शाहू नगर, काकडे प्लॉट, उस्मानाबाद | मुख्याध्यापक, नाईक प्राधमिक आश्रमशाळा, तांबेवाडी (तांडा), ता. बार्शी, जि. सोलापूर | विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सोलापूर | शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सेवा ज्येष्ठता यादी,माहे जून १९९९ कर्मचारी हजेरी पत्रक, सन १९९९-२०००, शैक्षणिक वर्षाची ऑडीट फाईल. | सर्व कागदपत्राच्या नकला विनामूल्य मिळाल्याने तक्रार राहिली नसल्याचे अपीलकर्त्याने दि. २०.१०.२००८ रोजी आयोगास कळविले. |
| २ | ६७४ / सोलापूर | श्री. हुकूमचंद हरिलाल भलाणी श्री. दत्त रोड, कुर्डुवाडी ता. माढा, जि. सोलापूर | सहायक निबंधक, सहकारी संस्था, माढा, ता. माढा, जि. सोलापूर | जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, सोलापूर | महात्मा ज्योतीराव फुले पतसंस्था मर्या. बारलोणी या संस्थेकडून संस्थेचे आयकार्ड, पॅनकार्ड, व आयकर भरणा विवरण पत्र, ताळेबंद प्रतीची माहिती | अपिलीय प्रधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सोलापूर यांनी सदर संस्थेंचे अपीलकर्ते हे सभासद नाहीत, संस्थेस कोणत्याही प्रकारचे शासकीय अर्थसाहय मिळत नाही. त्यामुळे संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही, हा निर्णय जा. क्र. कक्ष ४/ कबँक / मा अधिकारी/ अपिल/ २००७/ ५६७४, दि. १३.१२.२००७ कायम करण्यात येत आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

वरील तक्त्यातील अ.क्र. १ व २ अपिले (क्र. ७४९, व ६७४ ) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. २९.१२.२००८**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२४.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७६५ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.सूर्यकांत महादेव जुंदरे<br>रा.परिपूर्ती, १८७, यशवंतनगर,<br>तळेगाव -स्टेशन ४१० ५०७ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | दुय्यम निबंधक ,मावळ,<br>ता.वडगाव मावळ, जि.पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे ग्रामीण,पुणे | हजर |

दुय्यम निबंधक मावळ, ता.वडगाव मावळ, जि.पुणे या कार्यालयाने पंजीकृत करुन आलेल्या दस्तऐवजांबाबत कोणती कार्यवाही केली, या अनुषंगाने खालील मुद्यांबाबत माहिती अपीलकर्ता श्री.सूर्यकांत महादेव जुंदरे यांनी मागितली होती.

१. पंजीकृत करुन आलेल्या दस्तऐवजांपैकी कोणत्या तारखेपर्यंत वर्गीकरण केलेले आहे?

२. त्यापैकी किती दस्तऐवजी परत पाठविण्यासाठी पोस्टेज भरलेले दस्तऐवज आहेत आणि किती परत करण्यासाठी दस्तऐवज अदा केले नाही ?

३. किती दस्तऐवज संबंधितांना परत पाठविले आहेत आणि बाकीचे दस्तऐवज परत पाठविण्यास किती कालावधी लागेल ?

४. उर्वरीत दस्तएवेजांचे वर्गीकरण करुन संबंधितांना दस्तऐवज परत पाठविण्यास किती कालावधी लागेल ?

राज्य माहिती आयोगाने 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' करिता संबंधितांना दि.१३.०६.२००८ रोजीचे पत्रान्वये अवगत केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.२३.०६.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली म्हणजेच आयोगाने श्री.जुंदरे यांच्या द्वितीय अपिलावरील कार्यवाही सुरु

केल्यानंतर जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली म्हणून आयोगाने दि.१४.०८.२००८ रोजीच्या पत्रान्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा श्री.अविनाश गो.यादव यांच्याकडून त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत नियम २० अन्वये शास्तीची कारवाई का करु नये, याबाबत खुलासा मागविला होता.

त्यानुसार श्री.यादव यांनी त्यांच्या दि.२३.०८.२००८ रोजीच्या पत्रान्वये खुलासा सादर केला आहे. त्यांचे थोडक्यात विवेचन पुढीलप्रमाणे :

अपीलकर्ता श्री.जुंदरे यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यास प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्रथम अपील करणे आवश्यक होते. तथापि तसे त्यांनी ते केले नाही. त्याअन्वये प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यासमोर बाजू मांडण्याची संधी श्री.यादव यांना उपलब्ध झाली नाही. अर्जदार संस्थेचे ( अखिल भारतीय ग्राहक पंचायत, तळेगाव दाभाडे) अध्यक्ष यांना मागितलेल्या माहितीबाबत उत्तर देण्यात आले होते. विचारलेली माहिती कल्पितावर आधारित प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. वरील संस्थेचे अध्यक्ष व संघटक (श्री.जुंदरे) यांनी समक्ष भेटीत माहितीची आवश्यकता नसल्याचे सांगितले व त्या आशयाचे पत्र देण्याची स्वत:हून तयारी दर्शविल्यामुळे श्री.जुंदरे यांच्या माहितीच्या अर्जावर कार्यवाही करण्याची आवश्यकता राहिली नाही असे समजून कार्यवाही केली नाही. हा खुलासा मान्य करण्यात येत आहे. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील अर्जाबाबत अधिक तत्परतेने जन माहिती अधिकारी यांनी लक्ष घालणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२.माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त अर्जांवर विहित मुदतीत कार्यवाही करणे आवश्यक होते. याबद्दल जन माहिती अधिकारी, दुय्यम निबंधक वडगाव मावळ, जि.पुणे श्री.अविनाश गो.यादव यांना समज देण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक** ३१/१२/२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

१. श्री.तानाजी दत्तात्र्य बेनके
मु.पो.हिवरे बु. (भोरवाडी) ता. जुन्नर, जि. पुणे
२. श्री. अनिल श्रीकृष्ण तांबे — अपीलकर्ता
३. श्री. बाळासाहेब लक्ष्मण नलावडे
दोघे रा. मु.पो.ओतुर, ता. जुन्नर, जि. पुणे
४. श्री. शिवाजीराव विष्णू नलावडे
मु.पो. घोलवड, ता. जुन्नर, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
कार्यकारी संचालक श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना लि.,
निवृत्तीनगर, ता. जुन्नर, जि. पुणे

| अपील क्र. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| ९५९ / पुणे | दि. १६.६.२००७ | दि. १०.७.२००७ | दि. ११.६.२००७ | दि. २२.६.२००७ |
| १७३७ /पुणे | दि. २३.४.२००७ | दि. २५.५.२००७ | दि. ११.६.२००७ | दि. २२.६.२००७ |

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना लि.,निवृत्तीनगर, ता. जुन्नरच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतची सर्व माहिती. लेखा परीक्षण व दोष दुरूस्तीचा अहवाल, सन २००३ मध्ये संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी पात्र अ व ब वर्ग, सोसायटी सभासदांची यादी, सभासदाचे संपूर्ण नाव, व पत्ता, जन्म तारीख, वय, त्यांनी धारण केलेल्या भागांची संख्या व रक्कम रूपये, सभासदाचा क्रमांक, कारखान्यास ऊस पुरवठा करणारे सभासद, संचालक, कार्यकारी संचालक, विशेष कार्याधिकारी, संचालक मंडळ, समित्या, उपसमित्या व इतर अशा एकूण ४२ मुद्दयांची माहिती

## विवेचन

अपीलकर्ते श्री. तानाजी दत्तात्रय बेनके, श्री. अनिल श्रीकृष्ण तांबे, श्री. बाळासाहेब लक्ष्मण नलावडे व श्री. शिवाजीराव विष्णू नलावडे यांनी श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना लि., निवृत्तीनगर, ता. जुन्नर, जि.पुणे यांच्याकडे कारखान्याविषयीच्या एकूण बेचाळीस मुद्दयांची माहिती मागितली होती. कारखान्याच्या स्थापनेपासून आजतागायतचे लेखा परीक्षण व दोष दुरूस्तीच्या अहवालाच्या प्रतीपासून मातीच्या परीक्षणापर्यंत विविध मुद्दयांचा त्यात समावेश आहे. श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना लि. ही सहकार कायदा १९६० अन्वये नोंदविलेली रजिस्टर्ड संस्था आहे, त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ तिला लागू होत नाही व त्यामुळे माहिती देता येत नाही, असे कारखान्याचे प्रभारी कार्यकारी संचालक श्री. आर.व्ही. जंगले यांनी वरील चारही अपीलकर्त्यांना कळविले. त्याविरूध्द त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे विभाग, पुणे यांच्याकडे अपील केले. कारखान्याला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होतो, त्यामुळे शुल्काची रक्कम घेऊन माहिती द्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे विभाग, पुणे यांनी दिले. तरीही कार्यकारी संचालकांनी माहिती दिली नाही, म्हणून अपीलकर्त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे ही दोन अपिले केली आहेत.

दि. २४.६.२००८ (अपील क्र. ९५९) व दि. २६.११.२००७ (अपील क्र. १७३७) रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्त्यांच्या वतीने ॲड. अस्मा जी. खान यांनी 'आपल्याला ऐनवेळी हजर राहण्यास कारखान्याने सांगितले असल्याने विषयाचा अभ्यास करण्यासाठी मुदत मिळावी', अशी विनंती केली. आयोगाने ती मान्य केली. कारखान्याला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत असल्याचे साखर आयुक्तांच्या परिपत्रकात स्पष्ट असूनही माहिती नाकारण्यासाठी वेळकाढूपणा केला जात आहे, असे अपीलकर्त्यांनी त्यावेळी नमूद केले. त्यावेळी उभय बाजूंचे एकमत न झाल्याने दोनही अपिलांची एकत्र सुनावणी घेण्यात आली.

कारखान्यात मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार असून करोडो रूपयांचा भ्रष्टाचार संचालक मंडळाने केला आहे. नियमबाह्य कारभार चालला आहे. शासकीय लेखा परीक्षकही तो उघड करण्याचे

कर्तव्य पार पाडण्यास तयार नाहीत. त्यामुळे कारखान्याचे कामकाज कोणत्याही क्षणी बंद पडण्याची शक्यता आहे. हा सर्व विषय हजारो शेतकऱ्यांच्या जीवन-मरणाशी संबंधित आहे, म्हणून ही माहिती तातडीने मिळाली पाहिजे, असे प्रतिपादन सर्व अपीलकर्त्यांच्या वतीने श्री. तानाजी दत्तात्रय बेनके यांनी केले.

हा साखर कारखाना महाराष्ट्र राज्य सहकार कायदा १९६० अन्वये नोंदणी झालेली सहकारी संस्था आहे. राज्य व केंद्र सरकार, राज्य सहकारी बँक लि. (मुंबई), आय.डी.बी.आय., शुगर टेक्नॉलॉजी मिशन (नवी दिल्ली), राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नाबार्ड इ. शासकीय व निमशासकीय संस्थांकडून भागभांडवलापासून सवलतींपर्यंत विविध स्वरूपात कारखान्याला अर्थसहाय्य होत असते. शासकीय योजनांच्या सर्व सवलतींचा लाभ कारखान्याला मिळत असतो. म्हणून साखर आयुक्तांनी दि. १३.१०.२००५ च्या परिपत्रकान्वये सर्व साखर कारखान्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू असून कार्यकारी संचालक यांची जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आल्याचे जाहीर केले. तसेच या कायद्याचे काटेकोरपणे पालन करण्याचे आदेश साखर आयुक्तांनी सर्व कारखान्यांना त्याद्वारे दिले. त्यानुसार अन्य सर्व साखर कारखान्यांनी कार्यवाही केली आहे. साखर आयुक्तालय हे साखर कारखान्यांसाठीचे नियंत्रक कार्यालय आहे, या सर्व बाबी लक्षात घेता कारखान्याला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होतो, असे श्री. बेनके आदी अपीलकर्त्यांनी विस्ताराने नमूद केले.

कार्यकारी संचालकांच्या वतीने ॲड. अे.बी. ढमढेरे यांनी बाजू मांडली. शासकीय अधिसूचना अथवा आदेश याद्वारे सार्वजनिक प्राधिकरण म्हणून जाहीर केलेल्या संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होईल, असे अधिनियमाच्या कलम २(बी) मध्ये नमूद केले आहे. सहकार कायद्यानुसार नोंद झालेली ही संस्था आहे. साखर आयुक्तांचे परिपत्रक हे शासकीय आदेश अथवा अधिसूचना नाही, अशा प्रकारच्या आदेशांचे त्यांना अधिकार नाहीत. त्यामुळे त्यांचे परिपत्रक वैध ठरत नाही. त्यामुळे कारखान्याचे कार्यकारी संचालक हे सार्वजनिक प्राधिकरण ठरत नाही. साखर आयुक्त म्हणजे सरकार नव्हे, संबंधित विभागाच्या सचिवांनी तशी अधिसूचना काढली असती तर ती वैध ठरली असती, असे प्रतिपादन ॲड. ढमढेरे यांनी केले. श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याला भाग भांडवल वगैरे सवलती मिळत असल्या तरी तो सरकारी योजनांचा भाग आहे. सहकार कायद्याच्या कलम ३२

अन्वये सभासदाला (अपीलकर्त्यांना) माहिती मिळू शकते. परंतु केवळ सहकार कायद्यान्वये नोंद झाली आहे व अनुदान मिळते, म्हणून कारखान्याला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होतो, असे म्हणता येणार नाही, असा दावा ॲड. ढमढेरे यांनी केला.

कारखाना उभारणीस राज्य सरकारने मदत केली असून सुमारे १७ कोटी रूपयांचे भाग भांडवल दिले आहे. जादा ऊस अन्य कार्यक्षेत्रातून आणण्यासाठी वाहतूक अनुदानासह व अन्य प्रकारच्या सवलती कारखान्याला दिल्या जातात. कारखान्याच्या कर्जाला सरकारची हमी असते. त्यामुळे हे कर्ज बुडाल्यास सरकारला त्याची जबाबदारी घ्यावी लागते. कारखान्याच्या कार्यकारी संचालकांची नियुक्ती साखर आयुक्तालयाच्या मान्यतेने करावी लागते. साखर आयुक्त हे नियंत्रक अधिकारी म्हणून परिपत्रके काढत असतात व ती सर्व साखर कारखान्यांना बंधनकारक असतात. शासनाचे प्रतिनिधी म्हणूनच ते अशी परिपत्रके व आदेश प्रसृत करीत असतात. त्यामुळे श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्यालाही साखर आयुक्तांचे परिपत्रक बंधनकारक असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होतो, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे विभाग, पुणे श्री. डी.आर.घोडे यांनी केले.

कार्यकारी संचालक हे सार्वजनिक प्राधिकरण आहे, असे साखर आयुक्तांच्या परिपत्रकात म्हटले नसून साखर कारखाना हे सार्वजनिक प्राधिकरण व कार्यकारी संचालक हे जन माहिती अधिकारी असे त्याचे स्पष्ट स्वरूप आहे.

अपिलीय प्राधिकाऱ्यांनी निर्णय देऊनही जाणीवपूर्वक माहिती दिली नाही, म्हणून जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक यांना शास्ती करावी व कारखान्याची चौकशी करण्याचा आदेश द्यावा, अशी मागणी अपीलकर्त्यांनी केली. परंतु मुळात कारखान्याला हा अधिनियम लागू नसल्यामुळे पुढील प्रश्न उद्‌भवत नाही, अशी भूमिका कारखान्याने या प्रकरणी सातत्याने मांडली आहे. त्यांच्या वतीने ॲड. ढमढेरे यांनी त्याचा पुनरूच्चार केला. मात्र आपण मागितलेल्या माहितीबाबत कारखान्याने अशी भूमिका घेतली असली तरी यापूर्वी अन्य काही अर्जदारांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कारखान्याने माहिती दिली आहे, असे निवेदन श्री. बेनके यांनी संबंधित पत्राच्या प्रतीसह केले. आपण

मागितलेली माहिती दिल्यास गैरकारभार उजेडात येईल, म्हणूनच तांत्रिक मुद्दे उपस्थित करून दोन वर्षांचा कालापव्यय करण्यात आला आहे, असेही प्रतिपादन त्यांनी केले.

उभय बाजूंनी लेखी व तोंडी स्वरूपात विस्ताराने केलेली निवेदने लक्षात घेता श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होतो की नाही, हा यातील मतभेदाचा व निर्णय करण्याचा मुख्य विषय आहे.

साखर कारखान्यात भ्रष्टाचार झाला की नाही, याची चौकशी करणे हे राज्य माहिती आयोगाच्या कक्षेत येत नाही. मात्र कारखान्यासारख्या सार्वजनिक संस्थांकडून माहिती मिळणे हा नागरिकांचा हक्क आहे.

माहिती नाकारल्याबद्दल जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती करावी व त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी अपीलकर्त्यांची मागणी असली, तरी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कारखान्याला लागू होतो की नाही, हा मतभेदाचा मुद्दा असल्यामुळे त्याचा निर्णय झाल्यानंतर माहिती देणे / न देणे याबद्दलच्या कृतीचा विचार करता येईल, हे ॲड. ढमढेरे यांचे प्रतिपादन मान्य करण्यात येत आहे. त्यामुळे शास्तीची व अन्य कारवाईची अपीलकर्त्यांची मागणी अमान्य करण्यात येत आहे. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अन्य अर्जदारांना माहिती दिल्यानंतर या कायद्यातून पळवाट काढण्याची कारखान्याची / कार्यकारी संचालकांची भूमिका अयोग्य आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये सार्वजनिक जीवनात अभिप्रेत असलेल्या पारदर्शकतेच्या तत्त्वाच्या विरोधात हे वर्तन आहे. त्याबद्दल कार्यकारी संचालकांना व त्यांच्यामार्फत कारखान्याच्या संचालक वर्गाला कडक समज देण्यात येत आहे. हजारो शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित असलेल्या साखर कारखान्यासारख्या संस्थेने माहिती नाकारण्याचा अथवा लपविण्याचा प्रयत्न हा तेथील कारभाराबद्दल संशयाला वाव देणारा ठरतो, हेही येथे नोंदविणे आवश्यक आहे.

श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना ही सार्वजनिक संस्था असून कारखाना उभारणीपासून राज्य व केंद्र सरकार आणि विविध शासकीय, निमशासकीय संस्थामार्फत त्याला सातत्याने आर्थिक व अन्य सवलतींचा लाभ मिळत आला आहे. साखर आयुक्त हे शासनाचे प्रतिनिधी म्हणूनच परिपत्रक काढत असतात, हे लक्षात घेता केवळ शासकीय अधिसूचना काढलेली नाही, म्हणून तो आदेश वैध नाही, हा

युक्तिवाद तांत्रिक शब्दच्छलाचा आहे. हे परिपत्रक अमान्य असल्यास त्याविरूध्द सक्षम मंचाकडे दाद मागण्याचा अधिकार कारखान्याला होता व तसे गेल्या दोन वर्षात आजतागायत कारखान्याने केलेले नाही. कारखान्याला मिळालेल्या भागभांडवलासह शासकीय अनुदानापासून विविध लाभांपर्यंतचे अपीलकर्त्यांनी व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी केलेले विवेचन लक्षात घेता श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना हे सार्वजनिक प्राधिकरण ठरते व त्याला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ निःसंदिग्धपणे लागू होतो. म्हणून जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक यांनी अपीलकर्त्यांना माहिती देणे आवश्यक आहे. म्हणून आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## <u>आदेश</u>

१. अपिले मान्य करण्यात येत आहेत.

२. श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होते व अपीलकर्त्यांना माहिती निःशुल्क द्यावी, हा अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे विभाग, पुणे यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना लि., निवृत्तीनगर, ता. जुन्नर, जि. पुणे यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसांत सर्व माहिती अपीलकर्त्यांना निःशुल्क द्यावी व त्यानंतर तसा पूर्तता अहवाल आयोगाला त्वरित सादर करावा. या निर्णयानुसार पूर्तता न झाल्यास जन माहिती अधिकारी तथा प्रभारी कार्यकारी संचालक, श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना श्री. आर.व्ही. जंगले शास्तीस व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

४. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना यांच्यावर शास्ती व अन्य कारवाई करण्याची अपीलकर्त्यांची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २३.१२.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठा तर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. १९.११.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता.

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९८४ / सोलापूर | श्री. सुखदेव भानुदास भोसले मु. पो. रोपळे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, रोपळे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर, जि. सोलापूर | दि. २९.१२.०७ रोजी दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती. | विशेष अपील निर्गत कार्यक्रमात अपीलकर्त्याने माहिती स्वीकारली. |
| २ | १०५२/ सोलापूर | श्री. रामलिंग सिद्राम कवचाळे मु. पो. बोराळे, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, बोराळे, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर | विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, मंगळवेढा, जि. सोलापूर | जिल्हा परिषद शाळा, बोराळे, क्रीडांगणावरील व्यापारी गाळे बांधकामाच्या चौकशीची माहिती. | माहिती मिळाली असल्याने तक्रार राहिली नाही, असे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले. |
| ३ | १०१६/ सोलापूर | श्री. प्रसाद विठ्ठलराव पाटील मु. पो. पानगाव, ता. बार्शी, जि.. सोलापूर | उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम, बार्शी, उप विभाग, बार्शी, जि. सोलापूर | गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शी, जि. सोलापूर | तात्काळ दुरूस्ती कामांची संख्या, नावे (यादी), तरतूद व ठेकेदारांची यादी इत्यादी माहिती. | माहिती मिळाली असल्याने तक्रार राहिली नसल्याचे निवेदन अपीलकर्त्याने दि.१८.११.२००८ रोजी आयोगास सादर केले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | १०३२/ सोलापूर | श्री. जहिरूद्दीन शेख मिशन कपाऊंड, राहुरी, जि. अहमदनगर | उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर | ५ व्या वेतन आयोगाप्रमाणे श्रीम. मालनबी एखत्यार शेख यांचे कुटूंब निवृत्ती वेतन सुधारित करणेबाबत शासनाने मार्गदर्शन केल्याप्रमाणे महालेखापाल, मुंबई यांना सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत. | माहिती तयार आहे, अपिलकर्त्याने प्रत्यक्ष घेतल्यास दिली जाईल अथवा टपालखर्च पाठविल्यास टपालाने पाठविण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी [illegible]नी प्रपत्रात नमूद केले. |

आयोगाचा आदेश पुढील प्रमाणेः-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील अ.क्र. १ ते ४ अपिले (क्र. ९८४,१०५२, १०१६, व १०३२ ) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र. १०३२ मधील अपीलकर्ते श्री. जहिरूद्दिन शेख यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्वतः माहिती घ्यावी किंवा टपालखर्च जन माहिती अधिकारी यांना पाठवून टपाल[illegible] माहिती घ्यावी.

**पुणे**
**दि. ३१.१२.२००८**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२४.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९९२ / पुणे / २००७ | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.शेख महंमद रियाज<br>५८७, बुधवार पेठ, पुणे ४११००२ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, हवेली | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, हवेली | हजर |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.शेख महंमद रियाज यांनी दि.९.४.२००७ (प्राप्त दि.१२.४.२००७) रोजीचे अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली यांच्याकडे मौजे बाणेर स.नं.६/१/१ या मिळकतीचे बिनशेती आदेश क्र.एनए/एसआर/दोन/४२८/२००६ ची नक्कल मागितली होती.

अपीलकर्त्याने सदर अपील निकाली काढण्याबाबत आयोगास दि.२०.६.२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) या अपिलामध्ये पूर्ण कागदपत्रे सादर केलेली नाहीत. तसेच अपीलकर्त्याच्या वेगवेगळ्या कागदपत्रांवरील स्वाक्षरीत तफावत आहे. तक्रार राहिली नसताना अपील करणे व अन्य व्यक्तीने अपीलकर्त्याच्या नावे सही करणे, या गंभीर गैरप्रकाराबाबत आपला खुलासा दि.२०.१०.२००८ पर्यंत आयोगास सादर करावा. त्यानंतर याबाबतच्या कारवाईबाबत निर्णय घेण्यात येईल.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ५.१२.२००८**